# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 24/10/2020 (शनिवार)

(दुपार)

---

### गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत अर्धा कि.मी अंतरावर मौजा केळवद वार्ड क्र. 3 येथे दिनांक 22/10/2020 चे 19.00 वा. दरम्यान फिर्यादींच्या आई नामे– पुष्पा सुर्यवंशी या घरी हजर असतांना त्यांच्या घरासमोर येवुन आरोपी नामे क्र. 1) मनोज प्रभाकर हरोंडे, वय 26 वर्ष, 2) हेमराज शिवराम हरोंडे, वय 45 वर्ष, 3) नरेश प्रभाकर हरोंडे, वय 26 वर्ष, 4) सौ कविता हेमराज हरोंडे, वय 28 वर्ष, 5) प्रंजुल मनोज हारोंडे, वय 21 वर्ष, सर्व रा.केळवद, 6) कुमराज बलदेव प्रजापती, वय 31 वर्ष, 7) बलदेव आसाराम प्रजापती, वय 59 वर्ष, 8) बिंदीया बलदेव प्रजापती, वय 50 वर्ष, 9) श्यामा राजकुमार, वय 45 वर्ष, सर्व रा.सातनुर (म.प्र.) यांनी गैरकायदयाची मंडळी गोळा करून तिला म्हटले की, “तुझ्या पोरांने आम्हाला जादु टोना केला व घरासमोर निंबु फेकला त्यामुळे आमच्या मुलाचे अंगात देवी आली आहे, तुमचा मुलगा बाबा व लहान मुलगा अमोल कुठे आहे, त्यांना बोलव” असे म्हणत फिर्यादी घरातुन दाराजवळ आला असता आरोपीतांनी फिर्यादीला हातबुक्कीने व लातानी मारहाण केली. फिर्यादीची आई ही सोडविण्यास आली असता तिला सुध्दा आरोपीतांनी केस पकडुन दारात नेवुन मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीचे आई च्या हाताला व फिर्यादीस डाव्या पायाला डोक्याला मार लागल्याने ते जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अमोल प्रभाकर सुर्यवंशी, वय 25 वर्ष, रा. ढिवरपुरा वार्ड क्रं 3 केळवद ता सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीतांविरुध्द कलम 143, 147, 149, 323, 448, 452, 504, 506 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीताना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. सपोनि मट्टामी मो.न.7350968100 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर